Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# भारतीय दारिद्र्य बेरोजगार आणि कृषी विकासाचा समग्र अभ्यास

**डॉ. सुधाकर एस. गिरे**
प्राचार्य व अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आर. वाय. पी. महाविद्यालय,
विहा मांडवा, ता. पैठण, जि. छ.संभाजीनगर.

**प्रस्तावना :**

भारत कृषी प्रधान देश असल्यामुळे शेती हा उद्योग हा महत्त्वाचा आहे. त्याच बरोबर देशाची लोकसंख्या वाढत असल्यामुळे अनेक समस्या भारतात निर्माण होतात जसे दारिद्र्य, बेरोजगारी, अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य व शिक्षण यासारख्या पूर्ण करता येणारा दारिद्र्यात आहे असे म्हटले जाते आणि दोन हात काम मागतात .कुवत असताना व इच्छा असतील तरी काम मिळत नसेल तर त्यामुळे बेकारी निर्माण होते ते लोकसंख्या कमी मापक ठेवून जर शेती उद्योग आणि सेवा क्षेत्रांचा विकास केला तर निश्चित या समस्या कमी होऊन देशाचा विकासाचा देशाच्या विकासाला चालना मिळू शकते.

**महत्व/वैशिष्ट्ये.**

१) दारिद्र्य बेकारी आणि कृषी विकास यांचा समग्र अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.
२) भारतीय विकास हा कृषी कर आधारित आहे.
३) भारतातील उद्योग शेती व सेवा क्षेत्राचा विकास करता बेकारी कमी गरजेचे आहे.
४) भारतीय लोकसंख्या मापक करून या समस्या सोडवणे गरजेचे आहे.

**शैक्षणिक साधने**

१) दुय्यम सामग्री, दैनिके, शासकीय अहवाल, साप्ताहिके, कृषी विषयक मासिके.
२) सारणी, आलके, गुणाकार, गणितीय व सांख्यिकीय साधने.

**उद्दिष्टे**

१)भारतीय दारिद्र्य, बेरोजगारी यांची सद्यस्थिती माहिती करून घेणे.
२) भारतीय दारिद्र्य बेकारी कमी करणे.
३)उद्योग व सेवा याबरोबरच कृषी विकासाचा आढावा घेणे.
४) शेती विकासातून बेकारी कमी होण्यास कशी मदत होते ते पाहणे.

**भारतीय दारिद्र्य बेरोजगार आणि कृषी विकास समग्र अभ्यास.**

**(Poverty, Unemployment and Agriculture Development)**

**दारिद्र्य : (Rurtal Poverty)**

आपल्या मूलभूत गरजा भागवण्यासाठी उपलब्ध होणारी साधने ज्यांनी अपुरी पडतात, अशा माणसांची स्थिती म्हणजे दारिद्र्य असे स्थूल मानाने म्हणता येईल .या संदर्भात मूलभूत

गरजा कोणत्या हे निश्चित करावे लागते मूलभूत गरजांची व्याख्या मर्यादित किंवा व्यापक अशा दोन्ही दृष्टीने करता येते केवळ जिवंत राहण्यासाठी ज्या आवश्यक त्याच मूलभूत गरजा अशा मर्यादित व्याख्या केल्यास उपासमारीच्या जवळपास टेकलेले लोक दारिद्र्य समजावे लागतील. मूलभूत गरजांचा व्यापक दृष्ट्या विचार केल्यास ज्यांना अन्न वस्त्र आणि निवारा या गोष्टी जगण्यासाठी पुरेशा परंतु सर्वसाधारण जनतेच्या राहणीमानाशी तुलना करता कमी दर्जाच्या असतात .त्या सर्वांना दारिद्र्य समजावे लागेल. अर्थात दारिद्र्य ही एक सापेक्ष संकल्पना आहे निरनिराळ्या राष्ट्रांच्या दारिद्र्य लोकांची राहणी अन्य राष्ट्रातील दारिद्र्य लोकांच्या राहणे च्या राहण्याच्या मानाने कितीतरी उच्च पातळीवरील असू शकेल. उदा. अमेरिकेसारख्या विकसित राष्ट्रांमध्ये दारिद्री या सदरात मोडणाऱ्या लोकांजवळ मोटार, धुलाईयंत्र, दूरचित्रवाणी इत्यादी असू शकतील. अनारोग्य, शिक्षणाचा व कौशल्याचा अभाव, समाजापासून फटकून राहण्याची प्रवृत्ती विद्वांसक व बेशिस्त वागणूक दृष्टीचा अभाव इत्यादी गोष्टीही दारिद्र्याशी निगडित असलेल्या आढळतात परंतु दारिद्र्याच्या व्याख्यात त्यांचा समावेश सहसा करीत नाहीत. मात्र दारिद्र्याचे परिणाम व्यक्तीमात्रास तसेच समाजास नुकसानकारक ठरतात थोडक्यात दारिद्र्य म्हणजे समाजातील काही घटकांना जीवनावश्यक मूलभूत गरजांची पूर्तता करण्यात येणारी असफलता म्हणजे दारिद्र्य होय. गोडाड यांच्यामते, एक व्यक्ती आणि तिच्यावर अवलंबून असणारे इतर व्यक्ती यांची स्वास्थ्य, आरोग्य व त्याचे कार्यक्षमता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचा अभाव किंवा अपर्याप्त पुरवठा म्हणजे दारिद्र्य होय. भारत हा विकसनशील देश असून भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीत वाढ घडून आली असली तरी विकसित देशाच्या तुलनेने ते कमी आहे कारण अडथळा म्हणून दारिद्र्याकडे बघितले जाते.

**दारिद्र्याचे प्रकार: दारिद्र्याचे दोन मुख्य प्रकार पडतात.**

१) निरपेक्ष दारिद्र्य: व्यक्तीस आपल्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी किमान उत्पन्न मिळणे आवश्यक असते व्यक्तीचे उत्पन्न हे त्या ठराविक पातळीपेक्षा कमी असल्यास त्यास १) निरपेक्ष दारिद्र्यात असणारी व्यक्ती असे संबोधले जाते. व्यक्तीला रोजचे किमान उष्मांकयुक्त अन्न, वस्त्र व निवारा मिळणे आवश्यक असते. मानवाच्या मूलभूत गरजा असतात जर व्यक्तीच्या या मूलभूत गरजा देखील पूर्ण होत नसतील तर त्या व्यक्तीला निरपेक्ष दारिद्र्यता असलेली व्यक्ती असे म्हटले जाते प्राथमिक गरजेची पूर्तता करण्यासाठी किती खर्च लागतो याचा अभ्यास करून दरडोई उत्पन्न देशपातळीवर ठरविले जाते. देशातील दरडोई उत्पन्नापेक्षा कमी उत्पन्न पातळी असणारे व्यक्तीचा समावेश निरपेक्ष दारिद्र्यात येतो. उदा: ग्रामीण भागात ज्याला 2400 कॅलरी मिळू शकत नाहीत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती समजला जातो. भारतात दारिद्र्य मोजण्यासाठी निरपेक्ष दारिद्र्य विचारात घेतले जाते.

२) सापेक्ष दारिद्र्य ही वस्तुतः सापेक्ष संकल्पना आहे देशातील राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी लोकांमध्ये कशी होते त्यावरून देशातील सामाजिक कल्याण अवलंबून असते वैयक्तिक उत्पन्न

हे सामाजिक कल्याणाचे महत्त्वाचे निर्देशक मानले जाते .सापेक्ष दारिद्र्यातून देशातील उत्पन्न विषमता दिसून येते. निरपेक्ष आणि सापेक्ष या दोन्ही दारिद्र्याच्या सामाजिक कल्याणावर विपरीत परिणाम होतो. सापेक्ष दारिद्र्य मापनात लोकसंख्येचे विभाजन उच्च उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट असे केले जाते.

**नियोजन आयोगाची दारिद्र्याविषयी माहिती**

| वर्ष | दारिद्र्य | | | दारिद्र्य संख्या (कोटीमध्ये) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १९७३-७४ | ५६.४ | ४९.० | ५४.९ | २६.१ | ६.० | ३२.१ |
| १९८३-८४ | ४५.६ | ४०.८ | ४४.५ | २५.२ | ७.१ | ३२.३ |
| १९९३-९४ | ३७.३ | ३२.४ | ३६.० | २४.४ | ७.६ | ३२.० |
| २००४-२८.३ | २८.३ | २५.७ | २७.५ | २२.१ | ८.१ | ३०.२ |
| **रंगराजन समितीने सुचविलेल्या पाध्यातीनुसार आकडेवारी** | | | | | | |
| २००९-१० | ३३.८ | २०.९ | २९.८ | २७.८ | ७.६ | ३५.५ |
| २०११-१२ | २५.७ | १३.७ | २१.९ | २१.७ | ५.३ | २६.९ |
| **तेंडूलकर समिती सुचविलेल्या पद्धतीनुसार आकडेवारी** | | | | | | |
| २००९-१० | ३९.६ | ३५..१ | ३८.२ | १२.९ | १२.९ | ४५.५ |
| २०११-१२ | ३०.९ | २६.४ | २९.५ | १०.२ | १०.२ | ३६.३ |

१९७३-७४ ते २०११-१२ ची आकडेवारीवरून असे निदर्शनास येते की ग्रामीण भागातील दारिद्र्याचे प्रमाण हे जरी कमी होत असले तरी ते नागरी भागाच्या तुलनेने जास्त आहे सरकारने दारिद्र्य विषयक पाहणी करण्यासाठी रंगराजन समिती व तेंडुलकर समितीची नियुक्ती केली होती .या समितीने त्यांच्या वेगवेगळ्या निकषाच्या आधारे दारिद्र्याचे मापन केले आहे त्यामुळे आकडेवारी तफावत दिसून येते परंतु या वेगवेगळ्या निकषाच्या आधारे करण्यात आलेल्या आकडेवारी नुसार देखील २००९-१० व २०११-१२ मध्ये दारिद्र्याचे प्रमाण नागरी भागातील दारिद्र्याच्या तुलनेत ग्रामीण भागात जास्त आहे हे स्पष्ट होते ग्रामीण भागातील दारिद्र्याचे कारण ग्रामीण भागात दारिद्र्याचे प्रमाण जास्त असण्याची अनेक कारणे आहेत ती पुढील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहेत.

१) अल्पविकसितपणा : देशाचा ग्रामीण भाग अजूनही अल्प विकसित आहे त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब जनतेला दैनंदिन गरजा पूर्ण करणे ही शक्य होत नाही त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे.

२) आर्थिक विषमता : भारतातील लोकसंख्येमध्ये उत्पन्न व संपत्तीचे वाटप हे समान प्रमाणात झालेले नाही. ग्रामीण भागात तुलनेने हे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दारिद्र्याचे हे संकट दिवसेंदिवस बिकट होत आहे.

३) अल्पदरडोई उत्पन्न : ग्रामीण भागात उत्पन्नाचे मर्यादित साधने उपलब्ध असतात तसेच लोकसंख्येचे प्रमाण हे ग्रामीण भागात जास्त असते त्यामुळे उत्पन्नाचे स्त्रोत सर्वांना

रोजगार देण्यास असक्षम ठरतात त्यामुळे उत्पन्न कमी होते व दारिद्र्य वाढीस खतपाणी मिळते.

४) लोकसंख्येचा उच्च वृद्धी दर : ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण जास्त असते तसेच ग्रामीण जनतेत जागरुकतीचे प्रमाण कमी असल्याने लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढते या मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या च्या किमान गरजेच्या पूर्ततेचा प्रश्न निर्माण होतो परिणाम दारिद्र्यात भर पडते.

५) जीवनावश्यक वस्तूंची अल्प उपलब्धता: ग्रामीण भागात जीवाणवाश्यक वस्तूंची उपलब्धता कमी प्रमाणात असते त्यामुळे किमान गरजा पूर्ण करणे ग्रामीण जनतेला कठीण होते.

६) चलनवाढ: उत्पादन वाढीचा दर तुलनेने कमी असल्याने वस्तूच्या किंमती वाढतात याचा सर्वात जास्त परिणाम गरीब जनतेवर होतो व दारिद्र्य वाढ घडून येते.

७) तंत्रज्ञानाची अल्प पातळी: ग्रामीण क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान व पायाभूत सुविधांचा अभाव असतो त्यामुळे कृषी व उद्योगांचा विकासास अडथळा येतो त्यामुळे उत्पन्न कमी होते व दारिद्र्याचे प्रमाणात वाढ होते.

८) शिक्षणाचे अल्प प्रमाण: ग्रामीण भागात निरक्षरतेचे प्रमाण जास्त असते त्यामुळे ग्रामीण भागातील श्रमिकांना रोजगार संधी आवश्यकतेनुसार उपलब्ध होत नाही कारण गरीब श्रमिका मध्ये कौशल्य नसते त्यामुळे त्यांना रोजगार संधी उपलब्ध होत नसल्याने उत्पन्न कमी मिळते त्यामुळे गरिबीचे प्रमाण वाढते.

९) शेतीची अल्प उत्पादकता: भारतातील शेतीची उत्पादकता खूप कमी आहे भांडवलाचा अभाव, जुनाट उत्पादन तंत्र, शेतकऱ्यांची निराक्षरता, जलसिंचन सुविधांचा अभाव इत्यादी कारणामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे उत्पादकता कमी असल्याने उत्पन्न कमी होते व दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर वाढते.

१०) शेत जमिनीच्या वाटपातील विषमता :भारतात लहान सीमांत व भूमिहीन शेतमजुरांची प्रमाण जास्त आहे अशा कृषी श्रमिकांना व शेतकऱ्यांना शेतीतून मिळणारे उत्पन्नाचे प्रमाण हे खूपच कमी असते त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या गरजा पूर्ण करणे ही शक्य होत नाही.

११) हरितक्रांतीचा परिणाम: देशात १९६६ मध्ये हरितक्रांती घडून आली हरितक्रांतीमुळे गरीब व श्रीमंत यांच्या उत्पन्न विषमता वाढली हरितक्रांतीचा फायदा फक्त श्रीमंत शेतकऱ्यांना झाला गरीब शेतकरी अल्पभूधारक ,शेतमजूर मात्र हरितक्रांतीच्या लाभापासून वंचित राहिले. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांची अवस्था अतिशय बिकट झाली. कृषी क्षेत्रात अतिरिक्त लोकसंख्या कार्यरत असल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा दबाव पडतो अतिरिक्त श्रमिक संख्या शेतीवर अवलंबून असल्याने उत्पन्न कमी असते त्यामुळे दारिद्र्य फोफावते.

भारतातील लोकसंख्या प्रमाण हे जलद गतीने वाढत आहे या वाढत्या लोकसंख्येचा दबाव शेतीवर पडतो आणि त्यामुळे श्रमिकांची उत्पादकता कमी होते त्यामुळे कृषी रोजगारात घट होते परिणामी अन्नधान्याच्या किमती वाढतात आणि दरडोई उत्पन्न घडते भारतातील दारिद्र्याचे प्रश्न अत्यंत अवघड व गुंतागुंतीचा आहे भारताची लोकसंख्या प्रतिवर्षी सुमारे अडीच टक्क्यांनी

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

वाढत असल्यामुळे अर्थव्यवस्थेच्या एकूण विकासाचा वेग प्रतिवर्षी जर तीन टक्केच राहिला तर एकूण राष्ट्रीय उत्पादन उत्पादनापैकी अर्ध्या टक्के इतकेच उत्पादन दारिद्र्याचा परिहार करण्यासाठी शिल्लक राहू शकतो आणि अर्थातच दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या जीवनमानात फारसा फरक पडू शकत नाही.

ग्रामीण भागातील दारिद्र्य निरा करणाचे उपाय : दारिद्र्याच्या प्रश्न सोडवण्याकरता पुढील पाच उपाय सुचविता येतील.

१) कृषी व्यवसायातील भूमिहीन शेतमजुरांना मालकीची जमीन मिळाल्यास व उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक ती मदत साधने व मार्गदर्शन मिळाल्यास त्यांना आपल्या उत्पादनात भर टाकता येऊन दारिद्र्यातून बाहेर पडण्याचा मार्ग उपलब्ध होईल.

२) लहान शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीची उत्पादकता वाढवण्यासाठी जरूर त्या सुविधा उपलब्ध करून दिल्यास त्यांचे उत्पन्न वाढून ते स्वयंपूर्ण होऊ शकतील.

३) भाववाढीमुळे गरीब लोकांना दारिद्र्य अधिक कष्टप्रद होते म्हणून श्रीमंत लोकांची क्रयाशक्ती कमी करून तिचे सुयोग्य वाटप केल्यास गरिबांची क्रयाशक्ती वाढू शकेल उपलब्ध साधनसामग्रीचा उपयोग श्रीमंतांच्या गरजा भागविणाऱ्या उत्पादनासाठी न करता गरिबांना आवश्यक असलेल्या वस्तूंच्या निर्मितीसाठी केल्यास दारिद्र्याचा काहीही प्रमाण होणे शक्य आहे.

४) केवळ राष्ट्रीय उत्पादन व संपत्ती यांची वाढ झाल्याने दारिद्र्य नाहीसे करता येईल असे नाही उत्पादन वाढ कोणत्या वस्तूचे व सेवेची होते आणि तिचे व संपत्तीचे वाटप दारिद्र्य कमी करण्याच्या दृष्टीने कितपत सुयोग्य आहे हा प्रश्न महत्त्वाचा आहे म्हणूनच उत्पादना इतकेच वाटपाकडे लक्ष पुरविले जाणे आवश्यक आहे.

५) दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी अर्ध बेरोजगारांना आणि रोजगारांना किफायतशीर रोजगार मिळवून देणे हाच खात्रीलायक मार्ग आहे केवळ राज कोषीय धोरणात काही औपचारिक फेरबदल करून उत्पादनाच्या वाटपामधील विषमता काही प्रमाणात कमी केल्याने दारिद्र्याचा प्रश्न सुटणार नाही म्हणूनच आर्थिक विकासासाठी नियोजित विनियोग करताना श्रमप्रधान प्रकल्पांना अग्रक्रम देणे आवश्यक आहे.

६) आदिवासी आणि मागास वर्गातील लोकांना राष्ट्रीय उत्पादन प्रक्रियेत अधिकाधिक प्रमाणावर सामील करून घेण्याचे प्रयत्न होणे आवश्यक आहे

७) कुटुंबनियोजनाचा प्रचार व प्रसार वाढवून वाढत्या लोकसंख्येत आळा घालण्याने दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल.

८) पंतप्रधान इंदिरा गांधींनी १९७४ मध्ये पुरस्कार केलेल्या वीस कलमी आर्थिक कार्यक्रमांमध्ये दारिद्र्य कमी करण्याच्या दृष्टीने अनेक कार्यक्रम सुचविले आहेत त्याची धडाडीने अंमलबजावणी केल्यानेही दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांना पुष्कळ दिलासा मिळू शकेल पाचव्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमासाठी एकूण १०,३६४ कोटी रुपयाचे तरतूद करण्यात आली होती.

**ग्रामीण बेरोजगारी: (Rural Unemployment)**

कार्ल पिब्रम यांच्यामते ,बेरोजगारी ही श्रम बाजाराची अशी अट असते की ज्यात श्रमशक्ती ही रोजगार उपलब्धतेपेक्षा जास्त असते देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील लोकसंख्येला अवगत असलेल्या कौशल्य व ज्ञान यावर अवलंबून असते मानवसंसाधनाचा प्रर्याप्त उपयोग हा निःसंदिग्धपणे आर्थिक विकासाला हातभार लावतो भारतातील बेरोजगारी ही संरचनात्मक स्वरूपाचे आहे सोप्या शब्दात सांगायचे झाले तर उत्पादक क्षमता ही पुरेशा रोजगार संधी निर्माण करण्यास सक्षम असतात.

ग्रामीण रोजगाराचे स्वरूप: भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते विकसित अर्थव्यवस्थेच्या तुलनेत भारतातील बेरोजगारांचे स्वरूप पूर्णपणे वेगळे आहे भारतात बेरोजगारी ही मुख्यत्व करून भांडवलाचा अभाव नैसर्गिक संसाधनाचा पर्याप्त प्रमाणात वापर न करणे व रोजगार संधीतील अपूर्णता इत्यादी घटकामुळे वाढत आहे या घटकांच्या प्रभावामुळे भारतातील मोठ्या प्रमाणावरील ग्रामीण लोकसंख्या ही बेरोजगार आहे

ग्रामीण बेरोजगाराचे प्रकार: ग्रामीण बेरोजगाराचे ढोबळमानाने चार प्रकार पडतात.

१) हंगामी बेरोजगारी: भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. कृषी क्षेत्रात मिळणारा रोजगार हा हंगामी स्वरूपाचा असतो कृषीमध्ये विशिष्ट हंगामात मोठ्या प्रमाणावर श्रमिकांची मागणी असते परंतु हंगाम संपताच मात्र श्रमिकांच्या मागणीत गट होते भारतातील हंगामी बेरोजगारी हा विविध राज्य, शेतीच्या पद्धतीवर, शेतीच्या जमिनीचे स्वरूप एकापेक्षा जास्त पीक घेण्याची शक्यता या घटकांनुसार बदलत जाते पावसावर अवलंबून असणारे लहान सीमांत शेतकरी हे ४ ते ६ महिने बेरोजगार असतात निरक्षरता दारिद्र्य आणि कमकुवत स्वास्थ्य स्थिती असल्यामुळे या बेरोजगारीच्या कालावधीत या कृषी श्रमिकांना इतर रोजगारांचे पर्याय उपलब्ध होत नाही.

२) प्रच्छन्न बेरोजगारी : प्रच्छन्न बेरोजगारीत बेरोजगार व्यक्तीचे मापन करणे कठीण असते शेती क्षेत्रात आवश्यकतेपेक्षा जास्त श्रमिक काम करीत असल्याने तेथे अशी बेरोजगारी अस्ताविस्तर झालेली आहे या अतिरिक्त लोकसंख्येला शेती क्षेत्रातून काढून इतरत्र रोजगार उपलब्ध करून दिल्यास त्यांचा कृषी उत्पादनावर कोणताही परिणाम होत नाही शेतीत काम करण्यासाठी दोन व्यक्ती पुरेशा असतील तर कुटुंबात जर पाच व्यक्ती असतील तर या इतर व्यक्तींना इतरत्र काम नसेल तर सर्वच कुटुंब सदस्य शेतीत काम करतात त्यात पाच व्यक्तींना काम मिळाले आहे.

परंतु दोन व्यक्ती काम करत असताना होणाऱ्या उत्पादना इतकेच उत्पादन पाच व्यक्ती काम करीत असताना होत असेल तर यापैकी तीन व्यक्ती बेरोजगार आहे म्हणावे लागेल निकष यांच्यामध्ये अशा श्रमिकांची सीमांत उत्पादकता ही शून्य किंवा ऋणात्मक असते ग्रामीण भागात प्रच्छन्न बेरोजगारीचे प्रमाण हे २५ ते ३० टक्के पर्यंत आढळून येते यात लहान व सीमित शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आढळून येते.

३) खुली बेरोजगारी: जी बेरोजगारी उघडपणे दिसते ती खुली बेरोजगारी म्हणून संबोधले जाते प्रचलित वेतनावर काम करणारी इच्छा आणि कमी काम करण्यासाठी आवश्यक पात्रता व क्षमता असूनही व्यक्तीला काम मिळून शकत नाही अशा बेरोजगारास खुली बेरोजगारी म्हणतात ग्रामीण भागात लोकसंख्येचे प्रमाण मोठे असून या मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्येला रोजगार संधी मर्यादित स्वरूपात उपलब्ध असते आणि बऱ्याच लोकांना कोणत्या प्रकारचे काम मिळत नाही त्यामुळे अशा प्रकारची बेरोजगारी अस्तित्वात येते.

४) न्यून बेरोजगारी : जेव्हा व्यक्तीला पूर्णपणे रोजगार मिळत नाही किंवा व्यक्तीच्या उत्पादन क्षमतेचा पूर्णपणे वापर केला जात नाही तेव्हा अशा बेरोजगाराला अर्थ किंवा न्यून रोजगारी म्हटले जाते. ग्रामीण भागातील शेतमजुरांची बारा महिने काम करण्याची तयारी असते परंतु त्यांना वर्षातील काहीच महिने का मिळते ग्रामीण भागात शेतीच्या हंगामी काळातच रोजगार उपलब्ध होतो उर्वरित काळात शेतमजुरांना बेरोजगार राहावे लागते आठवड्यात २८ तासापेक्षा जास्त व ४२ तासापेक्षा कमी काम मिळते त्यास अर्ध बेरोजगार असे म्हटले जाते.

**ग्रामीण क्षेत्रात बेरोजगारी वाढण्याचे कारणे :**

१) जलद गतीने वाढणारी लोकसंख्या : भारतातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण हे जास्त असल्याने बेरोजगारावर त्याचा परिणाम होतो लोकसंख्या ज्या गतीने वाढते त्या प्रमाणात मात्र रोजगार संधी निर्माण होत नाही परिणामी बेरोजगारांचे प्रमाण वाढते.

२) कृषी क्षेत्रावर येणारा दबाव : ग्रामीण भागात कृषी हा मुख्य व्यवसाय मानला जातो मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या ही कृषी क्षेत्रावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असते त्यामुळे मजुरांचे दर तर कमी होतातच व बऱ्याचदा श्रमशक्ती मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने बऱ्याचशा श्रमिकांना रोजगार मिळत नाही त्यामुळे बेरोजगारांच्या संख्येत वाढ होते.

३) कृषीचे हंगामी स्वरूप : भारतातील शेती ही पावसाबरोबर पावसावर अवलंबून आहे त्यामुळे रब्बी व खरीप हंगामातच मोठ्या प्रमाणावर कृषी श्रमिकांची मागणी असते ४ ते ६ महिने कृषीश्रमिकांना काम नसते कृषी श्रमिक निरक्षर असल्याने त्यांना इतर कामे मिळवणे कठीण होते.

४) पावसाची अनिश्चितता : भारतात पाऊस अनिश्चित स्वरूपाचा असतो त्यामुळे पाऊस हा चार महिने होतो शिवाय तो अनिश्चित असतो त्यानंतर मात्र इतर जल स्तोत्रावर अवलंबून राहावे लागते भारतात जलसिंचन सुविधाचा विकास ग्रामीण भागात पूर्णपणे झालेला नाही त्यामुळे कृषी क्षेत्रातील उत्पादन प्रक्रिया मंदावते व काम मिळणे कठीण होते त्यामुळे बेरोजगारी वाढते.

५) जमिनीचे अपखंडन: जमिनीचे तुकडी करण होत असल्याने धारण क्षेत्राचा आकार कमी होतो लहान धारण क्षेत्रामध्ये जास्त मजूर काम करू शकत नाही त्यामुळे रोजगारीची समस्या निर्माण होते.

६) परंपरागत पद्धतीने करण्यात येणारी शेती : भारतातून ही परंपरागत पद्धतीने शेती केली जाते त्यामुळे बेरोजगार संधी उपलब्ध होत नाही.

७) परंपरागत उद्योगांचा ऱ्हास : ग्रामीण क्षेत्रातील परंपरागत उद्योगांचा हळूहळू ऱ्हास होत असल्याने ग्रामीण क्षेत्रात रोजगाराचा प्रश्न बिकट होत आहे परंपरागत उद्योगांमध्ये काम करणाऱ्या श्रमिकांना इतर उद्योगाची कौशल्य नसल्याने काम मिळत नाही.

८) दोषपूर्ण सामाजिक व्यवस्था: ग्रामीण भागातील दोषपूर्ण सामाजिक व्यवस्थेमुळे ग्रामीण भागात बेरोजगारीची समस्या वाढत आहे ग्रामीण जनतेमध्ये जागृती चे प्रमाण कमी असते तसेच निराक्षरता जास्त असल्याने शिक्षणाचे महत्त्व नसते त्यातून रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो.

९) व्यावसायिक गतिशीलतेचा अभाव: ग्रामीण भागामध्ये व्यवसाय किंवा विशिष्ट उद्योग धंदा करणाऱ्या लोकांमध्ये व्यावसायिक गतिशील तेचा अभाव दिसून येतो.

१०) असंघटित कृषी क्षेत्र : भारतात कृषी क्षेत्र जरी प्राथमिक क्षेत्र असले तरी आजही कृषीचे स्वरूप हे असंघटित स्वरूपाचे आहे कृषी संघटनेचा अभाव असल्याने ग्रामीण क्षेत्रात रोजगार विषयक समस्या निर्माण होते.

११) दोषपूर्ण शिक्षण पद्धती : ग्रामीण भागात शिक्षण पद्धतीचा अजूनही प्रसार व प्रगती झालेली नाही तसेच तांत्रिक शिक्षण संस्थेचे प्रमाणही कमी असल्याने ग्रामीण भागात शिक्षणाचे प्रमाण कमी दिसून येते त्यामुळे निराक्षरता जास्त आहे

१२) दारिद्र्य :ग्रामीण भागाचा विकास अपक्ष प्रमाणे झालेला नाही ग्रामीण भागात उत्पन्नाचे प्रमाण कमी असते गरिबांचे प्रमाण जास्त आहे कारण लोकांकडे उदरनिर्वाहासाठी पुरेसा स्त्रोत उपलब्ध नाहीत त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतात त्यात बेरोजगारी सर्वात मोठी समस्या आहे.

१३) रोजगारविषयक धोरणांचा अभाव : सरकारने ग्रामीण विकासासाठी अनेक रोजगार विषयक अनेक कार्यक्रम आपले आहेत परंतु या योजना किंवा कार्यक्रमाचे योग्य पद्धतीने अमलबजावणी केली जात नसल्याने त्याचा प्रतिकूल परिणाम म्हणजे आवश्यक तेवढ्या रोजगार संधी निर्माण होत नाही.

१४) कृषी विकास : भारताची अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते अल्प विकसित व विकसनशील देशांमध्ये कृषी क्षेत्र देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असते.

**नियोजन कालीन कृषी विकास: (Agriculture department in planning Period)**

आर्थिक नियोजन अंतर्गत कृषी क्षेत्राच्या विकासाला विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून कृषी विकासावर भर देण्यात आला आहे कारण औद्योगिक व सेवा क्षेत्र हे कृषी क्षेत्रावर अवलंबून असते त्यामुळे कृषी विकास करणे इष्ट ठरते नियोजन कारणे कृषी विकासाचा आढावा पुढीलप्रमाणे:

१) पहिली पंचवार्षिक योजना(१९५१-५६) : पहिली पंचवार्षिक योजना १ एप्रिल १९५१ पासून सुरू झाली या योजनेत कृषी विकासाला प्राधान्य देण्यात आले या योजनेची अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता व कच्च्या मालाचे उत्पादन वाढविणे हे दोन मुख्य उद्दिष्टे होते या

योजनेत शेती व शेती विषयक कार्यक्रमावर एकूण खर्चापैकी ३१ टक्के खर्च करण्यात आला या योजनेत अन्नधान्याचे उत्पादन ५५ लक्ष टन वरून ६५ टन इतके वाढले.

२) दुसरी पंचवार्षिक योजना(१९५६-६१): या योजनेची उद्दिष्टे म्हणजे कृषीपासून उद्योगांना कच्चा मालपुरेचा प्रमाणात पुरविणे शेतमाल निर्यातीत वाढ करणे विपणना च्या दृष्टीने व्यापारी पिकांचे उत्पादन वाढविणे हे होते कृषीसाठी या योजनेत ११.८ % खर्च करण्यात आला अशोक मेहता समितीने अन्नधान्याच्या किमती अनियंत्रित करण्यासाठी व विपणीत समस्या सोडवण्यासाठी अनेक शिफारशी केल्या.

३) तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१-६६ ): या योजनेत कृषी विकासाला प्राधान्य देऊन २१ % खर्च कृषी क्षेत्रावर करण्यात आला या योजना काळात दुष्काळामुळे कृषी उत्पादन कमी झाले त्याचा परिणाम म्हणून पॅकेज, प्रोग्रॅम किंवा हरितक्रांतीचा अवलंब करण्यात आला यात चांगले बियाणे रासायनिक खते पाणीपुरवठा आधुनिक अवजारे व यंत्रे कीटकनाशके इतक्यांचा वापर करण्यात आला त्यामुळे उत्पादन व विपणनात वाढ घडून आली.

४) चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-१९७४) : या योजनेत दरवर्षी कृषी उत्पादनाचा उत्पादनात ४० टक्के वाढ करणे व लहान शेतकऱ्यांना कृषी विकासात सहभागी करून घेणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले या योजनेत कृषी क्षेत्रावर २३ टक्के खर्च करण्यात आला तसेच आधुनिक अवजारे बी बियाणे उपकरणे इत्यादीचा वापर करण्यावर भर देऊन उत्पादन वाढीवर भर देण्यात आला.

५) पाचवे पंचवार्षिक योजना (१९७४-७९) : या योजनेत कृषी विकासासाठी कृषी मालाच्या किमतीत संबंध धोरण सदृढ बनविणे, कृषी अर्थ पुरवठ्यात वाढ करणे सिंचनाच्या सोयीत वाढ करणे इतक्यात उद्दिष्टे ठेवण्यात आली या योजनेत एकूण खर्चाच्या २२ टक्के खर्च कृषी क्षेत्राच्या विकासासाठी करण्यात आला.

६) सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८५): या योजनेत कृषी व विपणन कार्यक्रमावर भर देण्यात आला यात कृषी विषयक सेवेचा पुरवठा करण्यासाठी कृषी विकासासाठी मदत करणे ग्रामीण भागात गोदामांची व्यवस्था करणे शेतकऱ्यांना विपनासाठी मदत करणे या योजनेत कृषी विकास कार्यक्रमासाठी २४ टक्के खर्च केला गेला.

७) सातवी पंचवार्षिक योजना :(१९८५-९०) या योजनेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला गेला कृषीविषयक उद्दिष्टांमध्ये उत्पादनात वाढ करणे उत्पादकता वाढविणे शेतमाल उत्पादन तंत्रात सुधारणा करणे इतका दिवस भर दिला गेला या योजनेत कृषीसाठी २२ टक्के खर्च करण्यात आला.

८) आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९७): या योजनेत शेतमालाचे उत्पादन वाढविणे अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता आणि व शेतमालाची निर्यात वाढविणे वाहतूक दळणवळण विपणन इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध करून विकासाला गती देण्याचे कार्य करण्यात आले या योजनेत २१% खर्च करण्यात आला.

९) नववी पंचवार्षिक योजना (१९९७-०२): या योजनेत कृषी क्षेत्राच्या विकासासाठी २० टक्के खर्च करण्यात आला त्यात जलसिंचन सुविधा उत्पादकता वाढ कृषी व इतर विकासाच्या प्रादेशिक असमतोलतेचा अनुशेष भरून काढण्यासाठी ३३८१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली या योजनेत कृषी वृद्धी दर ३.९ % इतका होता.

१०) दहावी पंचवार्षिक योजना (२००२-२००७) : या योजनेत नवीन राष्ट्रीय कृषी धोरण जाहीर केले गेले या योजनेत नवीन धोरणे टाकून कृषी उत्पादन व विपणन वेगळ्या पद्धतीने करण्याचे ठरविण्यात आले या योजनेत २०.२ % खर्च करण्यात आला.

११) अकरावी पंचवार्षिक योजना (२००७-१२) : या योजनेत कृषी क्षेत्र व जलसिंचनासाठी ८.५५ % खर्च करण्यात आला या योजनेत कृषी उत्पादनात वाढ झाली पण तुलनेने ती कमी होती या योजनेत जलसिंचन सुविधा व आधुनिक शेतीच्या पद्धतीवर भर देण्यात आला.

१२) बारावी पंचवार्षिक योजना (२०१२-१७): या योजनेत देखील शेती आधुनिक पद्धतीने करण्यावर भर देण्यात आला आहे.

वरील विश्लेषणावरून कृषीला नियोजनात दिलेले प्राधान्य लक्षात येते देशाची वाटचाल आर्थिक विकासाकडे झपाट्याने होत असल्याने भारतातील कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी कमी होत आहे हा वाटा जरी कमी होत असला तरी आधुनिक तंत्राचा वापर करून शेती करण्यावर भर दिला गेल्यामुळे उत्पादकतात वाढ घडून आली आहे कृषी विकासासाठी सरकारने नियोजनात महत्त्व दिले आहे शाश्वती कृषी विकासासाठी कृषी क्षेत्रात संकरित बियाणे, जमिनीची सुपीकता, सेंद्रिय खताचा वापर ,जलसिंचित क्षेत्रात वाढ करणे अतिरिक्त पाण्याचा वापर टाळणे पाण्याच्या साठ्यांचे योग्य व्यवस्थापन सिंचन सुविधांमध्ये वाढ करणे एकापेक्षा जास्त पिकांची लागवड करणे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे संस्थात्मक वित्त पुरवठ्यात वाढ करणे इत्यादी घटक कृषी विकासासाठी महत्त्वपूर्ण असतात त्यामुळे कृषी विकासासाठी या घटकांकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**संदर्भ**

१) भारतीय अर्थव्यवस्था- डॉ. पतकी आणि पाठक.
२) दत्त व सुंदरम, इंडियन इकॉनमी, दिल्ली, एस. चांद अँड कंपनी १९९५.
३) गव्हर्मेंट ऑल्फक इंडिया, इकॉनोमिक सर्वे २०२१-२२ दिल्ली भारत सरकार २
४) अर्थसंवाद, दैनिके.
५) शासनाचे अहवाल
६) इंडिया टुडे